महाराष्ट्र शासन
सह आयुक्त (बृहन्मुंबई विभाग),
अन्न आणि औषध प्रशासन, म. राज्य,
३४१ वांद्रे कुर्ला संकुल, रिझर्व बँकेसमोर,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

FDA MAHARASHTRA

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Joint Commissioner (Greater Mumbai),
Food and Drugs Administration (M.S.)
341, Bandra – Kurla Complex,
Opp. RBI, Bandra (E),
Mumbai – 400051.
Tel:022 – 26592362/65,
Email: fdagmum@gmail.com

क्र.आस्था/भांडार/प्रिंटर रिफिलवार्षिक करार/ १४८ /-२०२५/४ दि.-०६/०८/२०२५

## दरपत्रक सुचना-२०२५-२६

विषय-कार्यालयातील प्रिंटर काट्रेज रिफील तसेच नविन काट्रेज खरेदी साठी सेवा सुविधा करार/दरपत्रके मागविण्याबाबत.

सहआयुक्त, बृहन्मुंबई, अन्न व औषध प्रशासन म.राज्य, वांद्रे कुर्ला संकुल, रिझर्व बँक समोर, वांद्रे पूर्व मुंबई-४०००५१ कार्यालयातील प्रिंटर काट्रेज रिफिलिंग करणेसाठी नमुद अटी व शर्तीनुसार वार्षिक दरकरार करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छूक पुरवठादारांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याबातचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

A. १.Samsung MLT Series १९३, १०८, १०१, १११ Laser toner cartridge,
   २. OPC Drum Replaced,
   ३. Doctor Blade, wiper, PCR Roller (If Required),
   ४. Compatible २०० laser toner cartridge

B. १. HP १२A, ३०A, ८८A, ४९A, ११०A Laser Toner refilling,
   २. OPC Drum Replaced,
   ३. Doctor Blade, wiper, PCR Roller (If Required),
   ४. Compatible २०० laser toner cartridge
   ५. HP९५५ XL INK JET Cartridges Refilling

C. १. Canon ९१२m ९२५, FX९, Laser toner refiiling GM४०७० Liquid
   २. OPC Drum Replaced,
   ३. Doctor Blade, wiper, PCR Roller (If Required),
   ४. Compatible २०० laser toner cartridge

D.१.Epson ३१७०, ११७० Refill Ink१२० ml.

सदर दरपत्रक ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांचे आत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकीटात पाठवावीत. विहीत वेळेत प्राप्त दरपत्रके मुदत संपल्यानंतर येणाऱ्या कार्यालयीन दिवशी तीन राजपत्रीत अधिकारी यांच्यासमोर उघडण्यात येतील.

कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्विकारण्याची वा नाकारण्याचे अधिकार सहआयुक्त बृहन्मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला

(वि.मा.जाधव)
सह आयुक्त बृहन्मुंबई
अन्न व औषध प्रशासन म.राज्य मुंबई

JOINT COMMISSIONER (GREATER MUMBAI) FOOD & DRUG ADMIN
MAHARASHTRA STATE
MUMBAI

## अटी व शर्ती

कार्यालयातील प्रिंटर काट्रेज रिफील तसेच नविन काट्रेज खरेदी साठी सेवा सुविधा करार/दरपत्रके मागविण्याबाबत.

१.एका संस्थेने एकच दरपत्रक सादर करावे, एकापेक्षा जास्त दरपत्रक सादर केल्यास ते सर्व रदद करण्यात येईल.

२.दरपत्रक सादर करण्यापूर्वी अधिकची माहिती हवी असल्यास सहआयुक्त बृहन्मुंबई कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन कार्यालयीन वेळेत चौकशी करू शकता.

३.आपण सादर केलेली दरपत्रके स्विकारली जातीलच याबाबत शाश्वती देता येणार नाही, याबाबत सहआयुक्त बृहन्मुंबई यांनी सर्व अधिकार स्वतहाकडे राखून ठेवले आहेत.

४.कार्यालयास प्राप्त होणारे दरपत्रकातील न्यूनतम दराच्या आधारे दरकरार करण्यात येईल.

५.करारात नमुद दराप्रमाणे या कार्यालयात येवून प्रत्यक्ष कामकाज करून केलेल्या कामकाजाबाबत दोन प्रतीत देयक सादर करावे लागेल.

६.सादर केलेली देयके विहित वेळेत अदा करण्याचा प्रयत्न केला जाईल, तरी सुध्दा मुख्यालयाकडून प्राप्त अनुदान, कार्यालयात उपलब्ध मनुष्यबळ इतर कामाकाज याचा विचार करता देयक अदा करण्यास विलंब होवू शकतो.

७.देयकाबाबत कोणत्याही प्रकारचे आगाऊ अग्रीम अदा केल्या जाणार नाही, तसेच प्रलंबित देयकाबाबत कोणत्याही प्रकारचे व्याज अदा केले जाणार नाही.

८.प्रिंटरचे रिफिल व त्याअनुषंगे दुरूस्तीसाठी लागणारे सुटे पार्टस आपणास आगाऊ खरेदी करून त्याबाबत देयक सादर करावे लागेल. त्यासाठी अग्रीम राशी मंजूर केली जाणार नाही.

९.आपल्या संस्थेच्या नावे बँकेत स्वतहाचे अकाऊंट खाते असणे आवश्यक आहे.

१०.शासकीय नियमाप्रमाणे टिडिएस,जीएसटी इ. कर देयकातून कपात करण्यात येईल्.

११.दरकराराप्रमाणे कामकाज न केल्यास मुदतीपूर्वी दरकरार रद्य करण्यात येईल.

१२.कार्यालयातील प्रिंटरची संख्या कमी अधिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामूळे कार्यालयातील सर्व प्रिंटरचे रिफिलचे कामकाज करावे लागेल.

१३.मोहरबंद पाकीटात समक्ष ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांचे आत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सहआयुक्त बृहन्मुंबई विभाग,अन्न व औषध प्रशासन म.राज्य,वांद्रे कुर्ला संकुल, रिझर्व बँक समोर, वांद्रे पूर्व मुंबई-४०००५१.येथे सादर करावी. त्यावर प्रिंटर कार्टेज रिफिलिंग करणेसाठी वार्षिक दरकरार करणे बाबतचे दरपत्रक असा उल्लेख असावा.

१४.ज्यांना रजिस्टर पोस्टाने दरपत्रक पाठवावयाचे आहे. त्यांनी दरपत्रक कोणत्याही परिस्थितीत जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांचे आत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल, याची दक्षता घ्यावी अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. दरपत्रकासोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. (उदा. पॅनकार्ड, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र इ.).

१५.दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रक धारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना उपस्थित राहता येईल. यशस्वी दरपत्रक धारकास दरपत्रक सफल झाल्याचे कळविल्यापासून एक आठवडयात प्रत्यक्ष कामाचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांचे दरपत्रक रद्धदबातल ठरविले जाईल.

१६.दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पाढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे कराये लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१७.कोणतेही कारण न देता कोणतीही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रक फेटाळण्याचा अधिकार सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.राज्य, वांद्रे कुर्ला संकुल, रिझर्व बँकेसमोर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना राहतील.

१८.वस्तूचे दर हे सर्व करासहीत नमूद करावेत. तसेच कोणत्याही परिस्थितीत सदर दर हे MRP पेक्षा जास्त असता कामा नयेत.

१९.पुरवठा केलेल्या वस्तू जाहीरातीत नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे न आढळल्यास पुरवठादारास परत केल्या जातील.

२०.प्रिंटर कार्टीजचे रिफिलिंग बाबत जशी या कार्यालयाची आवश्यकता असेल त्याप्रमाणे या कार्यालयात येऊन कार्टीजचे रिफिलिंग करावे लागेल.

JOINT COMMISSIONER (GREATER MUMBAI) FOOD & DRUG ADMN
सत्यमेव जयते
MAHARASHTRA STATE
MUMBAI